दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८/ २८१८११८३ / २८१८१३५३/२८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय भाईंदर

## MIRA BHAINDAR MUNICIPA CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.

जा. नं. मनपा/नर/२२६५/२०१४-१५ दिनांक : २०/११/२०१४.

प्रति,

१) ७/१२ धारक व कुलमुखत्यारपत्रधारक - मे. भवानी कन्स्ट्रक्शन
४, महावीर आर्केड, अपो. जी.सी.सी., मिरा रोड (पु.)

२) मे. अनिष ॲण्ड असो (वास्तुविशारद)
शॉप क्र. ०१ व ०२, भैरव सृष्टी, तळमजला,
धनलक्ष्मी बँकेच्या बाजुला, १५० फीट रोड, भाईंदर (प.)

विषय - हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र.
मौजे महाजनवाडी, स.क्र. ७८/३ब,४,५,६

संदर्भ - आपला दि.०३/११/२०१४ रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भीत पत्रान्वये सादर केलेल्या "विकास हक्क प्रमाणपत्र" साठीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपण महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेल्या जागेच्या मोबदल्यात यासोबत विकास हक्क प्रमाणपत्र क्र. **४९५** देण्यात येत आहे. सदर विकास हक्क प्रमाणपत्र खालील अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील बाब क्र. ३३ नुसार विकास हक्क प्रमाणपत्राचे वापर अथवा हस्तांतरण व पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) मौजे महाजनवाडी, स.क्र. (जुना)७८/३ब,४,५,६ या जागेमधील १५.०० मी. रुंद विकास योजने बाधित. स.क्र. ७८/३ब चे क्षेत्र ५२०.०२ चौ.मी., स.क्र. ७८/४ चे क्षेत्र ३१५.०० चौ.मी., स.क्र. ७८/५ चे क्षेत्र ४७५.०० चौ.मी., स.क्र. ७८/६ चे क्षेत्र ११०.०० चौ.मी. असे एकुण क्षेत्र **१४२०.०२ चौ.मी.** ही जागा नियोजन प्रभाग क्र. VII-B मध्ये येत असून तेथील डी.आर.सी. नियोजन प्रभाग VII-B मध्ये वापरता येईल.

३) हस्तांतर केलेल्या जागेचा मालकी हक्काबाबत न्यायालयात वाद निर्माण होऊन न्यायालयीन निर्णय घोषित झाल्यास उद्‌भवणा-या न्यायालयीन व आर्थीक परिणामाची जबाबदारी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार आपली राहील.

४) सदर प्रकरणात सादर केलेले हमीपत्र / प्रतिज्ञापत्र इ. चे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

५) भविष्यात सदरच्या विषयांकित जागेच्या मालकीहक्काबाबत किंवा हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल.

91 D.R.C.(Le) 14

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८/ २८१८११८३ / २८१८१३५३/२८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

## MIRA BHAINDAR MUNICIPA CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.

जा. नं. मनपा/नर/ २२६५/२०१८-१९ दिनांक : २०/११/२०१८

६) विकास हक्क प्रमाणपत्र वापरतांना किंवा खरेदी / विक्री व्यवहार करतांना दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक आहे.

७) सदर विकास हक्क प्रमाणपत्रानुसार चटईक्षेत्राचा उपयोग इतरत्र करण्यासाठी नियमावलीनुसार कार्यवाही करावी लागेल.

८) सदर विकास हक्क प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर केलेले अद्यावत कागदपत्रांची वैधतेबाबत विकासक व वास्तुविशारद यांची संयुक्तपणे जबाबदारी राहील. सादर केलेली माहिती, कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास विकास हक्क प्रमाणपत्र रद्द मानण्यात येवून नियमानुसार संबंधिताविरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

९) उपरोक्त अटी व शर्तीचे पालन न केल्यास विकास हक्क प्रमाणपत्राचे वैधतेबाबत विहीत कार्यवाही करण्यात येईल.

आयुक्त १९/११/१८
मिरा भाईंदर महानगरपालिका

92 D.R.C.(Le) 14